महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका//न.क्र.०५**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - २४०७७४४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६६१ दिनांक २२/०८/२०२३

**विषय:** "३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शासकीय कार्यक्रम व शासकीय पत्रव्यवहारावर बोधचिन्ह वापरण्याबाबत.

**संदर्भ:** शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/ प्र.क्र.४५९/सां.का.४ दि.२४ जुलै, २०२३.

*****

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भिय शासन निर्णय दि.२४.०७.२०२३ अन्वये **"३५० वा शिवराज्याभिषेक"** या निमित्ताने व छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तसेच जगभरात त्यांच्याबद्दलची माहिती पोहोचावी म्हणून सर्व शासकीय कार्यालयांमध्ये प्रशासकीय पत्रव्यवहारात विशेष बोधचिन्हाचा (Logo) वापर करण्याबाबतच्या सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत.

२. या अनुषंगाने शासनाच्या दि.२४.०७.२०२३ रोजीच्या उपरोक्त नमूद शासन निर्णयाच्या धर्तीवर सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजूरीनुसार **"३५० वा शिवराज्याभिषेक"** निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे व छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या खालील सुनिश्चित केलेल्या बोधचिन्हाचा (Logo) कंपनीच्या सर्व कार्यक्रमाच्या प्रचार / प्रसिध्दीत तसेच कार्यालयातील पत्रव्यवहारात कटाक्षाने वापर करावा. तसेच सर्व कार्यालयांमध्ये दर्शनी भागात सदर बोधचिन्ह चित्रित (Display) करावे.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी
स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

३. सबब, महावितरण कंपनीतील प्रशासकीय व क्षेत्रीय कार्यालयांमधील संबंधीत अधिकाऱ्यांनी शासन निर्णयामधील सूचनांचे अवलोकन करुन त्यांची आपल्या स्तरावर काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. सोबत शासन निर्णय दि.२४.०७.२०२३ ची प्रत जोडण्यात येत आहे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत**: वरिल प्रमाणे.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/(वित्त)/(वाणिज्य)/(प्रकल्प)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.
४) कार्यकारी संचालक (मासं)/(सुवअं)/(वित्त)/(महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा) /(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य तपास अधिकारी /मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय/सर्व परिमंडळ कार्यालय

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र) /(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

**"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शासकीय कार्यक्रम व शासकीय पत्रव्यवहारावर बोधचिन्ह वापरण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२१/प्र.क्र. ४५९/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ जुलै, २०२३

**प्रस्तावना :-**

"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या विशेष बोधचिन्हाचे लोकार्पण करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा जागर पुन्हा मराठी मनांमनात व्हावा, जगभरात जेथे जेथे मराठी माणूस आहे तेथे या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तसेच त्यांच्याबद्दलची माहिती पोहोचावी हा या मागील उद्देश आहे. त्यानुषंगाने, राज्य सरकारच्या माध्यमातून वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारात सदर बोधचिन्हाचा (Logo) वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"३५० वा शिवराज्याभिषेक" निमित्त शिवकालीन मंगल चिन्हे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, शौर्य अधोरेखित करणाऱ्या परिशिष्ट - "अ" मध्ये सुनिश्चित केलेल्या विशेष बोधचिन्हाचा (Logo) शासनाच्या सर्व शासकीय कार्यक्रमाच्या प्रचार/प्रसिध्दीत तसेच शासकीय पत्रव्यवहारांत कटाक्षाने वापर करण्यात यावा. तसेच, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर्शनी भागात सदर बोध्दचिन्ह चित्रित करण्यात यावे. सर्व मंत्रालयीन/प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांना सदर बाब निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत योग्य त्या सूचना प्रसारीत कराव्यात.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७२४१७३५५५७९२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VILAS RAMRAO THORAT

Digitally signed by VILAS RAMRAO THORAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CB03C92B399CC89310BF1378C184D97A4B7B9B98E926EA8E71DD7BC9CB273631, cn=VILAS RAMRAO THORAT
Date: 2023.07.24 17:39:00 +05'30'

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, विधान परिषद, विधान मंडळ, मुंबई
३. मा. अध्यक्ष, विधानसभा, विधान मंडळ, मुंबई

४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा यांचे खाजगी सचिव
९. राज्यातील सर्व सन्माननीय संसद व विधान मंडळ सदस्य
१०. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, यांचे स्वीय सहाय्यक
१२. सर्व अपर मुख्य सचिव / मा. प्रधान सचिव / मा. सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१४. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगर पालिका / मुख्याधिकारी, नगर पालिका
१५. सर्व क्षेत्रीय कार्यालय (मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत)
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१७. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई ४०० ०३२
१९. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
२०. निवड नस्ती, सां.का.४.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-८२२३/ प्र.क्र.४५९/सां.का.४, दिनांक २४ जुलै, २०२३ सोबतचे

"परिशिष्ट - अ"

